| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ११६ /२०२२ दि. १३/१२/२०२२

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोळसेवाडी वाहतुक उप विभाग हद्दीतील** डोंबिवली रेल्वे स्टेशन सागाव मानपाडा २.०५० लांबीचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन रस्त्याचे चौपदरीकरण कॉंक्रिटीकरण व मजबुतीकरण करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी,** डोंबिवली पुर्व साईबाबा सागाव चौक ते मानपाडा चौक दरम्यान रस्त्याचे खोदकाम करून कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे. यास्तव सदर मार्गावरून जाणारी वाहने पर्यायी मार्गाने वळविणे गरजेचे असुन सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) मानपाडा चौक येथुन साईबाबा सागाव डोंबिवलीचे दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **मानपाडा चौक येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** कल्याण फाटा बदलापुर चौक कडुन मानपाडा चौक कडे येणारी वाहने ही मानपाडेश्वर मंदिराचे बाजुने दिवा संदप रोड – एच पी गॅस गोडावुन – वाल्मेट कंपनी – गार्डीयन कॉलेज – शांतीनिकेतन येथुन भोपर रोडने – गजानन पाटील चौक – नांदिवली तलाव – स्वामी समर्थ मठ – पीएनटी चौक येथुन इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** कल्याण, उल्हासनगर कडुन मानपाडा चौक कडे येणारी वाहने ही पिंपळेश्वर हॉटेल येथुन उजव्या बाजुस वळण घेवुन – पिंपळेश्वर मंदिर – भारत गॅस गोडावुन – अफिता कन्स्ट्रक्शन एमआयडीसी रोड – टेम्पो चौक – एमआयडीसी सोनारपाडा रोड – साईबाबा सागाव येथुन इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) साईबाबा सागाव येथुन मानपाडा चौक कल्याण – शिळ रोडचे दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **साईबाबा सागाव चौक येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** डोंबिवली पुर्व साईबाबा सागाव, नांदिवली, कडुन मानापडा चौक कडे जाणारी वाहने स्वामी समर्थ मठ – नांदिवली तलाव – गजानन पाटील चौक– भोपर मानपाडा रोडने – शांतीनिकेतन येथुन उजव्या बाजुस वळण घेवुन – गार्डीयन कॉलेज – वॉलमेट कंपनी – एच पी गॅस गोडावुन – दिवा संदप रोडने – मानपाडेश्वर मंदिर येथुन कल्याण शिळ रोडने इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** तसेच सदरची वाहने साईबाबा सागाव डावे बाजुस वळण घेवुन एमआयडीसी सोनारपाडा रोड – टेम्पो रोड – आफिती कन्स्ट्रक्शन एमआयडीसी रोड – भारत गॅस गोडवुन – पिंपळेश्वर मंदिर – पिंपळेश्वर हॉटेल येथुन डावे बाजुस वळण घेवुन इच्छीत स्थळी जातील.

**वेग मर्यादा –** १) मानपाडेश्वर मंदिराचे बाजुने दिवा संदप रोड – एच पी गॅस गोडावुन – वाल्मेट कंपनी – गार्डीयन कॉलेज – शांतीनिकेतन येथुन भोपर रोडने – गजानन पाटील चौक – नांदिवली तलाव – स्वामी समर्थ मठ – पीएनटी चौक पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांची वेगमर्यादा ३० कि.मी/ताशी करण्यात येत आहे.

**वेग मर्यादा –** २) साईबाबा सागाव डावे बाजुस वळण घेवुन एमआयडीसी सोनारपाडा रोड – टेम्पो रोड – आफिती कन्स्ट्रक्शन एमआयडीसी रोड – भारत गॅस गोडवुन – पिंपळेश्वर मंदिर – पिंपळेश्वर हॉटेल पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांची वेगमर्यादा ३० कि.मी/ताशी करण्यात येत आहे

सदरची वाहतुक अधिसुचना ही दि. १४/१२/२०२२ पासून रस्त्याचे काम पुर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

– मा. जिल्हाधिकारी, ठाणे

– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.